**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक १३१ वा ● गुरुवार २८ सप्टेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 131 | Date : 28/09/2023 | blow :Thursday | Page 4 | Price 4

## बाप्पाच्या विसर्जनाला पावसाची हजेरी!

## राज्यासह देशभरात वरुणराजा बरसणार



मुंबई : मान्सूनच्या परतीच्या प्रवासाला सुरुवात झाली असून काही भागात पावसाचा धुमाकूळ पाहायला मिळत आहे. आज अनंत चतुर्दशी दिवशी मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आज १० दिवसांच्या बाप्पाचं विसर्जन होणार असून राज्यासह देशात ठिकठिकाणी पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. देशात आजपासून पुढील काही दिवस पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र, गोवा, मध्य प्रदेशसह अनेक राज्यात २८ सप्टेंबरपासून ३० सप्टेंबरपर्यंत पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

राज्यासह देशभरात अनेक भागात पावसाच्या जोरदार सरी कोसळणार आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, महाराष्ट्रासह गोवा, राजस्थान, तामिळनाडू आणि गुजरातच्या काही भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. त्यासोबत आंध्रप्रदेश, कर्नाटक, झारंखड, बिहार या राज्यांमध्येही पावसाचा अंदाज आहे. छत्तीसगड, ओडिशा, तेलंगणामध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेशात जोरदार पाऊसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

मुंबईसह राज्यात अनेक भागात आज वरुणराजा बरसणार आहे. मुंबईत काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पावसाचा अंदाज आहे. अहमदनगर, औरंगाबाद, सातारा, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाची हजेरी पाहायला मिळणार आहे. । पान २ वर

## ठाकरे गटाच्या चार खासदारांना शिंदे गटाच्या भावना गवळींची नोटीस

### महिला आरक्षणावर व्हिप न पाळल्याने कारवाई करणार

मुंबई: ठाकरे गटाने विधानसभा अध्यक्षांच्या वेळापत्रकावर आक्षेप घेतलेला असतानाच, शिवसेनेच्या शिंदे गटाने ठाकरे गटाच्या खासदारांना नोटीस बजावली आहे. ठाकरे गटाच्या चार खासदारांना ही नोटीस बजावली आहे. व्हिप न पाळता, महिला आरक्षण विधेयकाच्या मतदानाला अनुपस्थित राहिल्यानं शिंदे गटाच्या लोकसभेतील मुख्य प्रतोद भावना गवळी यांनी ही नोटीस बजावली.



महिला आरक्षणाचा व्हिप न मानणाऱ्या शिवसेना खासदारांवर कारवाई करणार असल्याचे संकेत शिंदे गटाचे गटनेते खासदार राहुल शेवाळे यांनी दिले आहेत. शिवसेना पक्षाच्या लोकसभेच्या प्रतोद भावना गवळी यांनी संसदेच्या विशेष अधिवेशनासाठी १४ सप्टेंबरला व्हिप काढला होता. महिला आरक्षण विधेयकाच्या बाजूने शिवसेना खासदारांनी मतदान करावं, असं भावना गवळी यांनी व्हिपद्वारे म्हटलं होतं. मात्र प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी शिवसेना ठाकरे गटाचे चार खासदार हे अनुपस्थित राहिले होते. त्यानंतर आता त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे.

लोकसभेत शिवसेना शिंदे गटाचे प्रतोदपद खासदार भावना गवळी यांच्याकडे असून त्यांनी जारी केलेला व्हीप शिवसेनेच्या सर्व खासदारांना बंधनकारक असल्याचं शिंदे गटाकडून सांगण्यात आलं आहे. १८ सप्टेंबर ते २२ सप्टेंबर दरम्यान आयोजित केलेल्या संसदेच्या विशेष अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठी खासदार गवळी यांनी पक्षाच्या वतीने सर्व खासदारांना व्हीप जारी केला होता. मात्र ठाकरे गटाच्या चार खासदारांनी मतदानावेळी उपस्थिती लावली नव्हती.महिला आरक्षण विधेयकाला लोकसभेत उपस्थित राहता पाठिंबा न देण्याच्या कृतीवर खासदार विनायक राऊत, । पान २ वर

## मंत्रालयात १० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम नेण्यावर बंदी

मुंबई : मंत्रालयातील प्रवेशाचे नियम आणखी कठोर करण्यात येणार असून अभ्यागतांना प्रवेश मिळण्यासाठी पूर्वनोंदणी करूनच वेळ घ्यावी लागेल. ज्या विभागामध्ये काम आहे, त्याच मजल्यावर अभ्यागतांना प्रवेश देण्यात येणार असून पिशवी, बॅग किंवा १० हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम मंत्रालयात नेता येणार नाही. मंत्रालयात प्रवेश करणाऱ्या अभ्यागतांच्या संख्येवरही नियंत्रण आणण्यात येणार आहे. गृह विभागाने मंत्रालय प्रवेश व सुरक्षेचे नवे नियम मंगळवारी जाहीर केले असून ते महिनाभरात लागू केले जाणार आहेत. मंत्रालयात २५ विभाग असून त्यांचे टपाल मंत्रालयाच्या प्रवेशद्वारात द्यावे लागणार आहे. अभ्यागतांना मोबाइल ॲपवर संबंधितांच्या भेटीबाबत वेळेसाठी पूर्वनोंदणी करावी लागेल. ज्या विभागात काम आहे, त्याच मजल्यावर अभ्यागतांना प्रवेश दिला जाणार आहे. मंत्रालयात प्रतिदिन सुमारे ३५०० तर मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी पाच हजार अभ्यागत येतात. मंत्रालयाच्या मुख्य प्रवेशद्वारातून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्री यांच्याच मोटारगाड्या येतील. सनदी अधिकाऱ्यांच्या गाड्या सचिव प्रवेशद्वारातून तर आमदार व इतरांच्या वाहनांना बगीचा प्रवेशद्वारातून आत येता येईल. कर्मचाऱ्यांचे जेवणाचे डबे वगळता बाहेरील खाद्यपदार्थ मंत्रालयात आणण्यास प्रतिबंध असतील. मेट्रो सबवेमध्ये कर्मचारी व अभ्यागत यांच्या तपासणीसाठी कक्ष उभा करण्यात येईल.

## बावची येथील ओढ्यावरील पूलाला साडेतीन कोटी मंजूर आ.आवताडे



पंढरपूर/प्रतिनिधी : गावाशेजारी असणाऱ्या ओढ्यावरील पुलासाठी तीन कोटी पन्नास लाख रुपये निधी मंजूर झाला आहे झाला असल्याचे माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली गावाभिड दौरा सुरू असताना बावची येथील ग्रामस्थांनी ओढ्यावरील पूल अत्यंत गरजेचा आहे तात्काळ तो फुल मंजूर करावा अशी मागणी केली होती या पत्राद्वारे संबंधित विभागाला या रस्त्यावर फुल उभारणे गरजेचे आहे त्यासाठी निधी उपलब्ध करून द्या अशी मागणी शासन दरबारी केली होती त्यानुसार । पान २ वर

## माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत अर्जदाराला वेळेत माहिती उपलब्ध करुन द्यावी : जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद




सोलापूर/प्रतिनिधीः माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याच्या व्यापक प्रसिद्धी व प्रभावी अंमलबजावणी करिता शासन स्तरावरून सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत. माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदींचा प्रभावीपणे व सकारात्मक वापर करुन अर्जदाराला वेळेत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा सुचना जिल्हाधिकारी कुमार आर्शीवाद यांनी केल्या.

दिनांक २८ सप्टेंबर हा दिवस माहिती अधिकार दिन म्हणून साजरा करण्यात येतो या दिवशी शासकीय सुट्टी असल्याने माहिती अधिकार दिन जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ सप्टेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर येथे साजरा करण्यात आला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सुनील खमीतकर, । पान २ वर



**तूच बुद्धिदाता, तूच पाठिराखा,**
**तूच गणाधीशा मोरया !**



राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या शासकीय निवासस्थानी विराजमान श्री गणरायाचे सहपरिवार दर्शन विकासरत्न आमदार माननीय सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी घेतले . यावेळी बाप्पांच्या आशीर्वादाने सर्वांच्या आयुष्यात सुख, शांती नांदो, अशी प्रार्थना केली.

**प्रथम नाव वक्रतुंड दुसरे एकदंत तें।**
**तीसरे कृष्णपिंगाक्ष चवथे गजवक्त्र तें।।**

मुंबईतील प्रसिद्ध आणि नवसाला पावणारा गणपती अशी ओळख असलेल्या लालबागच्या राजाचे सहकुटुंब दर्शन घेताना अक्कलकोट विधानसभा आमदार श्री सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या सोबत सहपरिवार उपस्थित होते

## ईद ए मिलादनिमित्त शुक्रवारी सुट्टी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा निर्णय



मुंबई : अनंत चतुर्दशी निमित्त गणेश विसर्जन आणि ईद ए मिलादचा सण एकाच दिवशी म्हणजे उद्या गुरुवार(२८ ता)होणार असून गर्दी आणि मिरवणुकांचे योग्य व्यवस्थापन करणे पोलीस प्रशासनास शक्य व्हावे म्हणून शुक्रवार २९ तारखेस शासकीय सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. ऑल इंडिया खिलाफत कमिटीच्या शिष्टमंडळाने यासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन विनंती केली होती.राज्यात शांततेचे वातावरण असावे आणि गर्दी तसेच मिरवणुकांचे नियोजन करता येणे पोलिसांना शक्य व्हावे म्हणून २९ तारखेस सुट्टी देण्याची विनंती त्यांनी केली होती. या शिष्टमंडळात खासदार राहुल शेवाळे, आमदार अबू आझमी, आमदार रईस खान, नसीम खान, आदींचा समावेश होता.

अनंत चतुर्दशीनिमित्त राज्याच्या विविध भागात गणेश विसर्जन मिरवणुका आणि ईद ए मिलादनिमित्त मिरवणुका काढण्यात येत असतात. दोन्ही सणांमुळे एकाच दिवशी निघणाऱ्या मिरवणुकांमुळे पोलीस यंत्रणांवर ताण येण्याची शक्यता लक्षात घेऊन २९ सप्टेंबरची सुट्टी जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**गणेश विसर्जन मिरवणुका शिस्तबद्धपणे, शांततेत पार पाडाव्यात**

अनंत चतुर्दशीनिमित्त गणरायाला आपण मनोभावे निरोप देऊ. विसर्जन मिरवणुकीतही नेहमीप्रमाणे शिस्त पाळावी आणि शांतता, सद्भावनेच्या वातावरणात गणेश विसर्जन पार पाडावे असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी राज्यातील गणेशभक्तांना केले आहे. गेले दहा दिवस श्री गणेशाच्या आगमनाने मांगल्याचे वातावरण निर्माण झाले. येणाऱ्या काळातही ईद तसेच नवरात्री, दसरा -दिवाळीसारखे सण आहेत. सर्वांनी एकोप्याने आणि भक्तिभावाने हे सण पार पाडावे आणि राज्याची परंपरा अधिक उज्वल करावी असेही मुख्यमंत्री आपल्या संदेशात म्हणतात. गणेशोत्सवाच्या काळात पोलिसांनी संपूर्ण राज्यात कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित राहील याची काळजी घेतली तसेच एकूणच गणेश मंडळांनी देखील नियमांचे पालन । पान २ वर

## दैनिक यश सिध्दी न्युज मुंबई विभाग मुख्य संपादक पदी विजय घनघाव



मुंबई /प्रतिनीधी : अल्पावधीत लोकप्रिय झालेले दैनिक यश सिध्दी न्युजच्या मुंबई विभागीय मुख्य संपादक पदी विजय घनघाव यांचे निवड केल्याचे माहिती संपादक कमलाकर सोनकांबळे यांनी सांगितले.अल्पावधीत लोकप्रिय झालेले दैनिक यश सिध्दी न्युज हे प्रिंट मीडिया सोबत डिजिटल मीडिया मध्ये अग्रसेर वृत्तपत्र असून सदर दैनिक डिजिटल व ईपेपर माध्यमातून जगभर प्रसिध्दी होत आहे ज्या वाचकांना वृत्तपत्र वाचण्यास मिळत नाही त्यांनी ईपेपर https://epaper.yashsiddhinews.com या वर ही अंक वाचू शकतात, ताज्या लाईव्ह बातमी पाहण्यासाठी http://www.yashsiddhinews.com या वेब पोर्टल भेट द्यावे आमच्या व्हॉट्स चॅनल वर बातम्या पाहण्यासाठी https://whatsapp.com/channel/0029VaASZZL7dmeXhulFdB0A याला फॉलो करा असे विभागीय मुख्य संपादक विजय घनघाव यांनी सांगितले






## ✻ सुविचार ✻

नास्तिक मनुष्य हा आस्तिक मनुष्याइतकाच धार्मिक असतो.

# संपादकीय

## माणुसकीची धूळधाण..

राज्यातील अनेक शहरांना भेदाभेद आणि जातीय ताणतणावाची झळ पोचताना आढळते. मात्र फक्त शहरात जातीय ताणतणावांचे दृश्य स्वरूप समाजाच्या अनुभवास येते असे नाही. अलीकडे जातीय ताणतणाव वाढत असून ही बाब निश्चितच चिंताजनक आहे. अनेक छोट्या छोट्या गावांमध्ये, वाड्या-वस्त्यांमधील जातीय तेढीला कदाचित वाचा फुटतही नसेल. महाराष्ट्र हे देशातील पुढारलेले राज्य मानले जाते. याला आळा घालण्यासाठी कायदे आहेत. सामाजिक जागरूकतेसाठी सामाजिक संस्था कार्यरत आहेत. एकोप्याला बढावा मिळावा म्हणून अनेक सरकारी योजना आहेत. आंतरजातीय विवाह होतात. तरीही जातींवरून भेदाभेद का निर्माण होत असावा? सत्तेच्या राजकारणात जात महत्त्वाचा घटक बनला आहे. सर्वपक्षीय नेत्यांचे वर्तन दुटप्पी आढळते. व्यासपीठावरून सामाजिक सलोख्याचा पाठपुरावा करण्यात कोणीही मागे नसतात. निवडणुकीचे वातावरण तयार होईपर्यंत हा सिलसिला सुरु असतो. निवडणूक जाहीर झाली की मग मात्र, जातीपातीची गणिते मांडली जातात. उमेदवारीचे तिकीट देण्याचा तो एक महत्त्वाचा निकष बनतो. ज्याची जातीय मतपेढी अधिक प्रभावी त्यालाच उमेदवारी मिळण्याची संधी. वरच्या पातळीवरचा हाच दृष्टिकोन खालपर्यंत पाझरतो. उमेदवारी करण्याची इच्छा बाळगणारे जातीय प्रभाव वाढवण्याचे उपाय शोधतात. राज्याला लाभलेल्या परंपरा, संत आणि समाजसुधारकांच्या वारशाचा दाखला दिला जातो. त्यांनी चालवलेल्या चळवळींचा अभिमानाने उल्लेखही केला जातो. त्याशिवाय राजकीय नेत्यांच्या सभा क्वचितच पार पडत असतील. संघटना आणि सामाजिक संस्थांच्या निर्मितीला जाणत्यांचा आक्षेप फारसा आढळत नाही. तथापि त्याच्या मुळाशी जातीयता असायला जाणते विरोध करतात. निवडणुकीदरम्यान कधी थेट तर कधी अप्रत्यक्ष राजकीय बळही मिळते. राजकारणातील हौशा, नवशा आणि गवशांना तो हक्क वाटू लागतो. आणि तिथेच समाज विघटनाची बीजे पेरली जातात. जातीपातींच्या खोट्या अभिमानापोटी ाणसे पोटच्या गोळ्याचा जीव घ्यायला मागेपुढे पाहत नाहीत. जातीबाह्य विवाह हे मुलींच्या छळाचे प्रमुख कारण आहे. अशा वृथा अभिमानापोटी माणसांची मने दुभंगतात. वैचारिकता प्रभावित होते. त्यात परस्पर विश्वासार्हता, माणुसकीची धूळधाण होते.

# गावोगाव दारू, चला विकास करू

राजकारण अर्थात देशातील संसद व राज्यातील राज्य विधी मंडळ हे नागरिकांच्या समस्या सोडवून राष्ट्र व राज्य यांना सुधारणा व विकासाच्या जोरावर मजबूत करण्याचे केंद्र बिंदु आहेत. जनकल्याण, राष्ट्रहित याच ठिकाणाहुन जोपासले जावे अशी तरतूद आहे. लोकांच्या हिताचे निर्णय घेऊन, लोकांचाच पैसा लोकांसाठी खर्च करून लोकांना अन्न, वस्त्र, निवारा शिक्षण, आरोग्य सुविधा देऊन मुलभूत समस्या दुर करण्यासाठी लोकसेवक अर्थात आमदार खासदार निवडून दिले जातात. प्रत्येक आमदार खासदार यांनी आपापल्या मतदार संघातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक ज्या काही समस्या असतील त्या समस्या जाणून घेऊया त्या तात्काळ सोडवण्याची जबाबदारी त्या लोकप्रतिनिधींची असते. या साठी दरवर्षी लाखों करोडो रूपयांचे बजेट जाहीर करून घोषणांचा पाऊस पाडला जातो. बजेटच्या पेरणीत आश्वासनाचा पाऊस पाडूनही विकास कामाचे व समस्या निर्मुलनाचे पिक उगवत नाही म्हणून समस्या वाढत जाऊन आमदार खासदार करोडपती होऊन देश व देशातील नागरिक मात्र कंगाल झाले. देशावर देशाच्या नावाने व देशात जनतेता कर्ज बाजारी आहे. सरकारने देशाच्या नावाने घेतलेले कर्ज देशातील च जनतेला फेडायचे आहे आणि जनतेचे कर्ज जनतेलाच फेडायचे आहे. म्हणजे आज जनता दुहेरी कर्जाच्या विखळ्यात अडकलेली आहे. दरवर्षी लाखो करोडोचे विदेशी कर्ज घेतले जाते, देशातील नागरिकांकडून झोपेतून उठल्या पासून झोपेपर्यंत जे काही वापरले जाते त्या प्रत्येक बाबींवर जास्तीचे कर आकारून सरकार महसूल जमा करत असतो. एवढे सारे करून सरकारने कर्मचाऱ्यांचे पेन्शन, नवीन कायमस्वरूपी भरती बंद करून पैसा वाचवायला सुरवात केली. कंत्राटी भरती करून कर्मचाऱ्यांना पगार कमी व कंपनीला नफा जास्त असे धोरण आखुन सरकारी नोकरी बंद करण्याचे षडयंत्र सुरू केले. सार्वजनिक संस्था विकुन पैसा मिळवला मग प्रश्न पडतो एवढा सारा पैसा नेमका खर्च होतो तरी कुठे? शिक्षणाचे खाजगीकरण, नोकरी चे खाजगीकरण, आरोग्य सुविधा व्हेंटिलेटरवर, सरकारी कार्यालये जुनेच, शाळेला रंगरंगोटी नाही, शासकीय कार्यालयतील स्वतः गृहाचा स्वच्छतेचा व पिण्याच्या पाण्याचा विषय गंभीर आहे. सरकारने कर्ज काढून, शासकीय मालमत्ता विकुन बचत करण्याचा प्रयत्न केला. नोकरी, शिक्षण, आरोग्य सुविधेवरचा खर्च करून बचत करण्याचा प्रयत्न केला मग अजून महसूल निर्माण करण्याची गरज का केली. अगोदर हे तर स्पष्ट करून द्यावे कि देशातील संपती विकुन, विदेशी कर्ज काढून, जास्तीचे कर लादुन गोळा केलेला पैसा नेमका खर्च करतात तरी कुठे? खर्चाचा हिशोब सार्वजनिक का केला जात नाही? सरकारचे मुख्य काम प्रत्येक विद्यार्थ्यांला गुणवत्ता पुर्ण व मोफत शिक्षण आहे त्याच ठिकाणी देणे. शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून मदत करणे, शिक्षण संपल्यानंतर योग्यते नुसार शासकीय कायमस्वरूपी नोकरी देणे. आयुष्यभर शासकीय सेवा केल्यानंतर वृद्धापकाळात नागरिकांना मानासन्माने जिवन जगता यावे म्हणून पेंन्शन देणे हे काम सरकारचे आहे. हे करताना नागरिकांना आरोग्य विषयक सुविधा देऊन इतर हक्क अधिकाराचे संरक्षण करून महागाई वर नियंत्रण ठेवण्याचे काम सरकारचे आहे. शैक्षणिक संस्था कंपनीला देऊन शिक्षणाचा बाजार सरकार करत आहे. एकिकडे मोफत धान्य देणाऱ्या देशात महाग शिक्षण मोफत धान्य वाल्यांना परवडणारे आहे का? मोफत धान्य दिले जाते कारण त्यांची आर्थिक परिस्थिती नाजूक आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्याने मोफत धान्य देणारे सरकार जर शिक्षणाचा बाजार करत असेल तर सर्व सामान्य लोकांनी मुलांना शिकवायचे कसे? शिक्षणाने विद्यार्थी अधिकारी होतात, परंतु शिक्षण नसेल तर तेच भिकारी होतील. आणि भिकारी माणसाला स्वाभिमान गहाण ठेऊन लाचारी करावी लागते. थोडक्यात काय तर सरकारचे धोरणे सर्व सामान्य मुलांना अधिकारी नाही तर भिकारी बनवण्याचे आहेत. सुशिक्षित बेरोजगार तरुणांची संख्या ही सर्वांत मोठी समस्या असताना त्यांच्या हाताला काम नाही. सरकारने तरुणांच्या हाताला काम देण्याऐवजी नवीन दारूचे दुकाने उघडण्याचा निर्णय घेऊन हातात दारूचा ग्लास देण्याचा निर्णय घेतला आहे. तरूणांना व्यसनाधीन बनवून महसूल गोळा करण्याच्या नावाखाली कंपन्यांचा उद्धार करण्याचा अजेंडा सरकार राबवत आहे. शाळा बंद पाडून दारूचे दुकान सुरू करणे खरचं हे नैतिक दृष्टीने शोभणारे कृत्य आहे का? बर शाळा कोणत्या कंपण्या चालवणार तर ज्या कंपन्याचे लाखो करोडो रुपये कर्ज सरकारने माफ केले. अशा दिवाळखोरीत निघालेल्या कंपन्या शिक्षण स्वतः कडे घेऊन शिक्षणाचे दिवाळे केल्याशिवाय शांत बसणार नाहीत. फेक कोरोना महामारी मध्ये लोकांची काळजी आहे असा आव आणून लोकांच्या सुरक्षितेच्या नावाखाली जबरदस्तीने लसीकरण करण्यात आले. लसीकरणा नंतर सरकारने सर्वोच्च न्यायालयात लसीकरण सत्तीचे नसुन ऐच्छिक होते. आणि त्याच्या दुष्परिणायाबद्दल सरकार जबाबदार राहणार नाही असे प्रतिज्ञापत्र सादर केले तो भाग वेगळा. लसीकरणा नंतर लोकांचे आजार व मृत्यू वाढले हा भाग स्वतंत्र चर्चेचा विषय असला तरीही लोकांच्या आरोग्यासाठी लसीकरण सरकारने जबरदस्ती करून घेतले. याचाच अर्थ सरकारला लोकांच्या आरोग्याची काळजी आहे असा मुळीच नाही. कारण काही दिवसा अगोदर एक संशोधन अहवाल समोर आला. त्या अहवालानुसार दारूचा एक घोटही कर्करोगाला कारणीभूत ठरू शकतो. जर दारूमुळे कर्करोग होऊ शकतो हे माहिती असताना दारूचे दुकान सुरु करण्याचा निर्णय घेणे म्हणजे लोकांच्या आरोग्याशी खेळणे होय. दुसरी गोष्ट म्हणजे बेरोजगार तरुण व्यसनाच्या आहारी गेले तर व्यसनाधीन व बेरोजगार तरुण चुकीच्या मार्गावर जाऊन चोर आणि दरोडेखोर बनल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे शाळा सुरू करून ज्या तरूणांना शिक्षणाच्या माध्यमातून रोजगार देऊन त्याला अधिकारी कर्मचारी सरकारने बनवायला पाहिजे तेच सरकार शाळा बंद करून दारूचे दुकान सुरू करून तरूणांना भिकार आणि लाचार बनवून सोडेल. महसूल गोळा करण्याच्या नावाखाली दारूची दुकाने सुरू केल्या पेक्षा आठ दिवसांत बावीस लाख रुपयांचे जेवण करणाऱ्या आमदार खासदार यांच्या कडून महसूल गोळा का केल्या जात नाहीत? जे लोक चार्टर्ड विमानाने गुवाहाटी जाऊन मौज मस्ती करून करोडो चा चुराडा करतात त्यांच्या कडून महसूल का गोळा होत नाही? राज्यातील सत्ता बदल होताना तिन हजार करोड रुपये खर्च झाल्याच्या बातम्या प्रसारित झाल्या, प्रती व्यक्ती पन्नास कोटी रुपये घेतल्याचे आरोप करण्यात आले. परंतु हे आरोप आहेत यात कोणतेही तथ्य नाही यासाठी ज्यांच्या वर आरोप झाले त्यांनी स्वतः ची, कुटूंबाची व जवळच्या नातेवाईक यांची चौकशी करा पण पैसे घेतल्याचे सिद्ध करून दाखवा असे आवाहन कोणीच केले नाही याचा अर्थ पन्नास कोटी मध्ये तथ्य आहे. जर सत्ता बदल करताना तिन हजार करोड रुपये खर्च होऊ शकतात तर मग दोनशे कोटी साठी दारुची दुकान सुरू करण्याची वेळ सरकार वर का आली? मुंबई महानगरपालिका मधील मधील नगरसेवक फोडण्यासाठी सातशे करोड रुपये खर्च करण्यात आल्याच्या बातम्या समोर आल्या. जर फोडाफोडीचे राजकारण करण्यासाठी हजारो करोड रुपये खर्च होत असतील तर दोनशे करोड रूपयां साठी कोणी लोकांच्या जिवाशी खेळून त्यांचे आजार व कर्ज वाढवून लाचारीचे मरण देणार नाही ही बाब सत्य आहे. सरकार ने लोककल्याणाचे धोरणे आखण्या ऐवजी लोकांच्या समस्या वाढत कशा जातील अशी धोरणे आखुन सर्वसामान्य लोकांचे जगणे अवघड केले आहे. गावोगावी शिक्षण सुविधा, आरोग्य सुविधा, रोजगार केंद्र विकसित करून लोकांचा सर्वांगीण विकास करण्या ऐवजी गावागावात दारूचे दुकान उघडून सरकार नेमका कोणाचा विकास करणार हा विषय मात्र संशोधनाचा आहे. गावागावात दारू सुरू करण्याचा निर्णय हा आजच एकदम घेतला गेला नाही तर २०१९ पासून गावोगावी दारू, तिन हजार लोकसंख्या मागे एक दारुचे दुकान असा निर्णय घेण्यात आला होता. परंतु राजकारणाला जाती धर्माशी जोडून या निर्णयाला विरोध सर्व सामान्य लोकांकडून करण्यात आला नाही. लोक जागृत नसल्याचा व धर्माच्या नावावर लोक विरोध करत नाहीत हे लक्षात येताच गावातील शाळा खाजगी कंपनीला देऊन शिक्षण महाग व दारूचे दुकान गावातच सुरू करून दारुची व्यवस्था गावातच करून आपण विकासाच्या दिशेने जात आहोत. जनतेच्या समस्या काय? त्या सोडवायच्या कशा? शिक्षण, आरोग्य, रोजगार यापासून सरकार दुर कसे जाऊ शकते? असे प्रश्न सर्वसामान्य लोकांनाच पडत नाहीत म्हणून सरकार चुकिचे ध्येय धोरण आखून समस्या वाढवत असते. एका घरात एक दारूड्या असल्यावर त्या घराची परिस्थिती काय होते हे केवळ त्या घरात राहणाऱ्यांना माहिती असते. आता दारुचे दुकान गावातच म्हणल्यावर लोकांचा ओढा दारूच्या दुकानाकडे जाऊन व्यसनाधिन, कर्जबाजारी होतील पण शासनाला महसूल गोळा करून देतील मग शासन व्यसनमुक्ती चे कार्यक्रम सुरू करून लोकांच्या आरोग्याची काळजी घेईल व विकासाचा डोंबारा जाहिराती मधुन मिरवेल. जनतेच्या हिताचे काम करण्याची जाणीव जर लोकप्रतिनिधींना करून द्यायची असेल तर आपण बॅलटपेपर वर निवडून घेण्याचा आग्रह धरावा. तरच सत्ताधारी लोकांवर वचक बसेल. ईव्हीएम च्या माध्यमातून निवडून झाल्या तर येणारा काळ खुपच चिंताजनक असेल. आणि आजही लोक जागृत होऊन समोर आले नाही तर गावोगावी दारू, चला आपण विकास करू असेच म्हणावे लागेल.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**समाज एकता अभियान**
**रा. आरेगांव ता. मेहकर**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

## ईद ए मिलादनिमित्त शुक्रवारी सुट्टी ..

करून सर्वांचा हा आवडता उत्सव आनंदाने पार पाडला त्याबद्धल मुख्यमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले.उत्सव साजरा करतांना आपल्याला स्वच्छतेचे महत्व डोळ्याआड करता येणार नाही. स्वच्छ महाराष्ट्राची मोहीम आपण हाती घेतली आहे. १ ऑक्टोबरला आपण आपली गावे, वॉर्ड कचरामुक्त करणार आहोत. गणेश मंडळांनी देखील विसर्जन आणि त्यानंतर आपल्या आसपासचा परिसर स्वच्छ ठेवण्यास प्रशासनाला मदत करावी आणि चांगला संदेश द्यावा असेही मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे.

**मुख्यमंत्र्यांकडून ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा**

'ईद-ए-मिलादचे उत्सव पर्व सौहार्द-सलोखा घेऊन येईल. यातून परस्परांतील आदर-प्रेमभाव आणि स्नेह वाढीस लागावा,अशी मनोकामना व्यक्त करत मुख्यमंत्र्यांनी ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा दिल्या आहेत. 'प्रेषित मोहम्मद पैगंबर यांनी जगाला त्याग आणि प्रेमाचा संदेश दिला. त्यांचे जीवन हाच एक मोठा संदेश आहे. त्यातून प्रेरणा घेऊन आपण परस्पर आदर-प्रेमभाव वाढीस लावण्याचा प्रयत्न करूया,' असेही आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

## माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत..

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, ईशादीन शेळके, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे, कार्यकारी अभियंता नरेंद्र खराडे आदी उपस्थित होते.

शासकीय माहिती अधिकाऱ्यांनी आपल्याकडे आलेल्या अर्जदारांना योग्य प्रकारे मार्गदर्शन करावे. तसेच एखाद्या विषया संबंधी माहिती मागितली असेल तर त्यांना योग्य व अचूक माहिती उपलब्ध करून द्यावी. माहिती अधिकाराच्या अधिनियमाची यशस्वीपणे अंमलबजावणी करण्यामध्ये शासकीय माहिती अधिकारी यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडावी अशा सूचनाही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी यावेळी केल्या. यावेळी माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदी व त्यावरील विविध शासन निर्णय याबाबत तहसीलदार गीता गायकवाड व नायब तहसीलदार रामकृष्ण पुदाले यांनी मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमात महसूल व जिल्हापरिषद सोलापूर येथील अधिकारी व कर्मचारी यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे विस्तृत विवेचन व उजळणी प्रशिक्षण देवून माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला.

## ठाकरे गटाच्या चार खासदारांना

ओमराजे निंबाळकर, राजन विचारे आणि संजय जाधव यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे संकेत शिंदे गटाकडून देण्यात आले आहेत.

शिंदे गटाचे संसदेतील गटनेते खासदार राहुल शेवाळे म्हणाले की, ठाकरे गटाला समर्थन करणाऱ्या चार खासदारांनी या व्हीपचे उल्लंघन केले आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी नेहमीच महिला आरक्षणाच्या समर्थनाची भूमिका घेतली होती. पण त्यांच्या विचारांचा वारसा सांगणारे हे चार खासदार महिला आरक्षण विधेयका विषयी मतदानाच्या वेळी सभागृहात उपस्थित नव्हते ही लाजिरवाणी आणि दुर्दैवी घटना आहे. यापैकी खासदार ओमराजे निंबाळकर हे तर दिल्लीमध्ये असूनही ते सभागृहात आले नाहीत. महिलांचा अवमान करणाऱ्या या खासदारांना जनता त्यांची जागा दाखवून देईल.

## बाप्पाच्या विसर्जनाला पावसाची

बीड, परभणी, सोलापूर, जालना आणि हिंगोली जिल्ह्यातही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, तामिळनाडूमध्ये हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर, आंध्रप्रदेशसह केरळ आणि कर्नाटकच्या किनारपट्टी भागात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. देशातील काही भागांतून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरु झाला आहे. यंदा मान्सून माघारी फिरण्यास काहीसा उशिर झाला आहे. मान्सूनच्या परतीचा प्रवास यावर्षी आठ दिवस उशिराने सुरु झाला आहे.

नैऋत्य मोसमी पाऊसही माघार परतण्यास सुरुवात झाल्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. राजस्थानमधून नैऋत्य मान्सून माघारी फिरला आहे. वायव्य आणि लगतच्या पश्चिम भारतातील आणखी काही भागांतून पुढील दोन ते तीन दिवसांत नैऋत्य मान्सून माघारी फिरण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण होत आहे. २९ सप्टेंबरपासून पूर्व भारतात मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## बावची येथील ओढ्यावरील पूलाला

नाबार्ड कडून नुकतीच राज्यातील कामाची यादी जाहीर झाली आहे त्यामध्ये या फुलाची मंजुरी मिळाली आहे आ. अवताडे यांनी सांगितले मंगळवेढा तालुक्यातील खोमनाळ भाळवणी भाळवणी निंबोणी बावची सलगर हा महामार्ग असून या रस्त्यावर भाऊची येथे वड्यावर फुलाची आवश्यकता होती मोठ्या पावसात या रस्त्यावर पाणी येत होते त्यामुळे वाहतुकीच्या कोळंबा होत होता त्यामुळे या ठिकाणी फुल गरजेचे आहे बावची येथील अश्फाक पटेल या ग्रामस्थांनी केली होती त्यानुसार मागणी केल्याने सरकारने तात्काळ या फुलाचा निधी दिला असून दळणवळणाचा मार्ग सुखकर होणार असल्याचे आ. अवताडे यांनी





## वाडगं : खूप काही शिकवणारं आत्मकथन

आत्मचरित्र वाचणं हा नेहमीच एक वेगळा अनुभव असतो. ते वाचत असताना काही काळापुरतं का होईना, आपण लेखकाच्या आयुष्याचा, जीवनपटाचा जणू एक भाग होऊन जातो. काहीसा असाच अनुभव वाडगं यात जाणवत राहतो.बी अनिल तथा अनिल भालेराव याच्या वाडगं या आत्मकथनाने एक वेगळीच शैली मनाला भिडत राहते. सहज, सोपी, ओघवती आणि आपलीशी वाटणारी भाषा ही या आत्मकथनाची जमेची बाजू आहे. लेखक त्याचा बालपणीच्या आठवणी सांगत सहजच मन व्यापून टाकतो. लेखकाच्या आयुष्यातील त्याचं बालपण ते शालेय शिक्षण हा भाग अगदी गंमतीशीर तर आहेच त्याचबरोबर समस्येतून बाहेर कसे यावे, हेही शिकवतो.ज्या परिस्थितीत त्याचं आयुष्य घडलं ती चिमुकल्या वयातील किंवा वाढत्या वयातील मुलांसाठी पूरकच नाही, तर अशा प्रतिकूल परिस्थितीत मनाचा संयम आणि स्वयंशिस्त ढळू न देता योग्य मार्गांवर चालणं ही खरोखर एक मोठी परीक्षाच आहे, हे या आत्मकथनात दिसून येतं.लेखकाच्या सभोवती जे जे घडलं ते त्याने जसंच्या तसं आपल्यापर्यंत पोहोचवलं आहे. म्हणजे त्याच्या वयातील मुलं ज्याप्रमाणे विविध ठिकाणी, विविध प्रसंगी वावरतात, निरागसपणे सारं काही पाहतात, त्यांच्या त्यांच्या बुद्धीनुसार अर्थ लावतात किंवा नाहीतर मग निर्वीकार राहतात. अगदी तसाच तटस्थपणा आत्मकथनात जाणवत राहतो आणि तोच मनाला भावतो.दैनंदिन जीवनातील अडीअडचणीचे, वेदनादायी वर्णन करणारे प्रसंग असो की गंमती जमतीचे मौजमजेचे असो हे सर्व काही तटस्थपणे मांडले आहे. कुटुंब, नातेवाईक, मित्र ही माणसाच्या जीवनातील खरी शक्ती,संपती आणि स्फूर्ती असते, जी सहजपणे माणसाला जगण्याची दिशा देत असते हे सुद्धा पदोपदी या आत्मकथनात जाणवत राहतं. इतर मित्र परिस्थितीमुळे वाकून जातात तेथे अनेक अडचणीवर मात करत लेखक शिक्षण पूर्ण करत एक आदर्श डोळ्यासमोर उभा करतो.शिक्षण हाच पाया आणि शिक्षण हीच शिडी.... जीवनाच्या उत्कर्षसाठी हेच हे आत्मकथन अधोरेखित करते.

शोषित वंचित समाजाचा विविध पिढ्यांचा अनुभव हा वेदनादायी तर आहेच, त्याचबरोबर संघर्षमय सुद्धा आहे. यात धर्मातरीत बौद्ध समाजाने डॉ. आंबेडकर यांचा आदर्श जपत स्वाभिमानी जगणं किती कठीण आहे, हे आव्हानात्मकरित्या लेखक आत्मकथनाच्या माध्यमातून मांडताना दिसतो, पण कुठेही आकस किंवा द्वेष डोकवताना दिसत नाही. लेखकाचे जगणं प्रत्येक पिढीतील मुलांसाठी प्रेरणादायी आहे. आत्मकथन वाचून खडकात, रानावनात, काट्याकुपाट्यात उमलणारी काही फुलं असतात ज्यांना मशागत मिळते ना खतपाणी तरीसुद्धा ती तग धरून राहतात, फुलतात आणि स्वतः आनंदी होतं इतरांनाही आनंदी करतात. वाडगं खरोखर एक संघर्षाबरोबर आनंद यात्रा सुद्धा आहे.

**पुस्तकाचे नाव :वाडगं**
**लेखक :अनिल भालेराव**
**प्रकाशक :चेतक बुक्स, पुणे**
**पृष्ठे :१४४**
**किमत :२७०**









नऊ महिने त्रास सहन करून,
जि आपल्याला या जगात आनते ति आपली
आई असते
जि आपली पहिली शाळा बनते
ति आपली आई असते
जे आपले सर्व हट्ट पुरवते ति
आपली आई असते
चुकल्यावर आपन आपल्यावर
जी प्रेमाने रागावते
ती आपली आई असते
जि आपल्यावर निस्वार्थपणे प्रेम करते
ती आपली आई असते
लहानापासून मोठ्यांची काळजी घेते पण
स्वतःच्या काळजीकडे जिच लक्ष नसते
ति आपली आई असते.
जि दिवसभर काम करून
थकते, दमते ,कंटाळते
तरीही उत्साहाने आपल्या
अभ्यासात आपली मदत करते ति आपली
आईच असते
जेव्हा आपण आजारी असतो
तेव्हा जि रात्रभर जागी राहते
ति आपली आईच असते.
स्वतःला होणारा त्रास आणि
दुःख लपवून जी आपल्या कुटुंबासाठी जगते
ति आपली आईच असते
आपल्या चांगल्यासाठी जी नेहमी देवाकडे
प्रार्थना करते
ति आपली आई असते,
जि आपल्याला वाईट नजरे- पासुन वाचवून
ठेवते ति आपली आई असते.
जिच्यासाठी तिच सर्वकाही तिचे लेकर आनी
कूटूंब
असते
ति फक्त आपली आईच असते

**कु. पूर्वी विलास मडावी . वर्ग- ७वा**
**मु.पो.आयता ता.आर्णी जी.यवतमाळ**
**७६६६० ६३०८७**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी जात प्रमाणपत्र महत्वाचे, होलार समाजासाठी लवकरच शिबिरांचे आयोजन : श्रीमती गीतांजली बाविस्कर

पुणे : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मार्फत होलार समाज यांचेकरिता जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी आणि इतर बाबींवर मार्गदर्शनपर एक दिवसीय विभागीय स्तरावर कार्यशाळेचे आयोजन मा. सुनिल वारे, महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी तथा मुख्य समन्वयक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या महाराष्ट्र राज्य व मा. इंदिरा अस्वार, निबंधक बार्टी, यांच्या मार्गदर्शनात सामाजिक न्याय भवन नाशिक येथे प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण, विभाग नाशिक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जिल्हा नाशिक, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण जिल्हा नाशिक यांच्या सहकार्याने, दिनांक २६ सप्टेंबर २०२३ मंगळवार रोजी नाशिक विभागातील सर्व जिल्ह्यांचे होलार समाजातील समाज बांधव, होतकरू तरुण-तरुणी यांचे करिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जिल्हा नाशिक च्या सन्माननीय अध्यक्ष श्रीमती गीतांजली बाविस्कर मॅडम, अपर जिल्हाधिकारी निवड श्रेणी तथा अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती जिल्हा नाशिक तर प्रमुख वक्ते म्हणून श्री. बबन काकडे, उपविभागीय अधिकारी, महसुल उप विभाग बागलाण, जिल्हा नाशिक, श्री. राकेश पाटील, उपायुक्त तथा सदस्य, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, जिल्हा नाशिक, बार्टी मुख्यालय प्रशिक्षण आणि कौशल्य विकास विभाग यांचे विभाग प्रमुख श्री. अनिल कारंडे, श्री. देविदास नांदगावकर सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, जिल्हा नाशिक, श्री. चौधरी महिला व बालविकास विभाग अधिकारी, श्री. संतोष शिंदे, जिल्हा व्यवस्थापक, महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ, जिल्हा नाशिक यांची प्रमुख उपस्थिती या कार्यशाळेला लाभली.

तर या कार्यशाळेचे आयोजन करण्याकरिता मार्गदर्शन व सहकार्य श्री. माधव वाघ, प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग नाशिक यांचे लाभले.जात प्रमाणपत्र व त्याकरिता आवश्यक कागदपत्रे यावर मार्गदर्शन करताना श्री. काकडे म्हणाले की, जात प्रमाणपत्र प्रक्रिया पूर्वी प्रत्यक्ष तहसील मध्ये जाऊन आवश्यक कागदपत्रे सादर करावी लागत होती, आता शासनाने आपले सरकार, महा-ई-सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र, सेतू यासारख्या विविध सहजतेने उपलब्ध होणाऱ्या सोयी सर्व सामान्य नागरिकांना उपलब्ध करून दिले आहेत.

याचा नागरिकांनी आवर्जून लाभ घ्यावा. याचबरोबर जात प्रमाणपत्र करिता आवश्यक दस्ताऐवज कोणते हे त्यांनी स्पष्ट केले तसेच उपस्थित होलार समाज बांधवांच्या जात प्रमाणपत्राविषयीच्या प्रश्न - अडचणी यांचे शंका निरसन केले.



समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक, सामूहिक व सामायिक लाभाच्या योजना याविषयी श्री. नांदगावकर यांनी माहिती दिली.

याबरोबर महिलांसाठी विविध प्रकारच्या योजना व त्याचे लाभ तसेच कायदेशीर मदत याविषयी माहिती श्री. चौधरी यांनी उपस्थित नागरिकांना दिली.

महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळ जिल्हा नाशिक चे जिल्हा व्यवस्थापक श्री. संतोष शिंदे यांनी महामंडळाच्या माध्यमातून राबवण्यात येणाऱ्या योजना याविषयी अधिक माहिती दिली.

कौशल्य विकास विभागाच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या तरुण-तरुणींसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांची माहिती टाटा स्ट्राइव्ह प्रतिनिधी श्री. चांदोरकर यांनी दिली.

या कार्यशाळेत होलार समाजातील समाज बांधवांसोबत महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

तर होलार समाजाचे प्रतिनिधी म्हणून व ज्यांचे या कार्यशाळेला महत्त्वाचे सहकार्य लाभले असे श्री. नामदेवराव अहिवळे यांनी मनोगत व्यक्त करताना होलार समाजाची सद्यस्थिती यावर मांडणी करताना शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर भाष्य केले आणि या कार्यशाळेतून समाजाला निश्चितपणे दिशा मिळेल अशी आशा व्यक्त केली आणि बार्टीचे महासंचालक सन्माननीय श्री. सुनिल वारे यांचे या विशेष कार्यशाळांचे विभाग स्तरावर आयोजन करण्यासाठी दिलेल्या मान्यतेसाठी आणि प्रत्यक्ष आयोजनासाठी सर्व होलार समाज बांधवांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

या कार्यशाळेच्या अध्यक्षीय भाषणात सन्माननीय बाविस्कर मॅडम यांनी अनेक संदर्भ देऊन जात प्रमाणपत्र व त्यांच्या पडताळणी आणि याचे असणारे अनन्यसाधारण महत्त्व याविषयी भाष्य करताना सामाजिक बांधिलकी म्हणून समाजातील लोकांनी स्वतःहून पुढाकार घेणे आवश्यक आहे आणि पाठपुरावा करणे,

त्याचबरोबर आवश्यक असणारे कागदपत्रे कसे मिळवता येईल याविषयी अतिशय सखोल व अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन तर केलेच याचबरोबर त्यांनी नाशिक विभागात जात प्रमाणपत्रांपासून जे अद्याप वंचित आहेत, त्यांचे करिता विशेष अभियान तहसील व प्रांत कार्यालयामार्फत आवर्जून राबविण्यात यावे यावर समितीमार्फतही विशेष शिबीरे यांचे आयोजन करण्यात येणार आहे. याकरिता महसूल विभाग, बार्टी आणि समाज कल्याण विभाग यांच्या समन्वयातून तालुका व गाव पातळीवर देखील याबाबत विविध माध्यमातून जनजागृती तसेच प्रत्यक्ष शिबिरांचे आयोजन देखील करण्यात येणार आहे हे आवर्जून नमूद केले आणि उपस्थित नागरिक यांचे अडीअडचणी आणि शंका यांचे निरसन केले.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महापुरुषांचे प्रतिमांना पुष्पअर्पण व दीप प्रज्वलन करून आणि भारतीय संविधान उद्देशिकेचे वाचन करून या कार्यशाळेची सुरुवात करण्यात आली. श्री. वाघमारे, समतादुत यांनी उद्देशिका वाचन केले.

कार्यशाळेच्या सुरुवातीस श्री. अनिल कारंडे, उपजिल्हाधिकारी तथा विभाग प्रमुख, प्रशिक्षण व कौशल्य विकास विभाग यांनी आनापान सत्र घेऊन त्याचे महत्त्व विशद केले.

या कार्यशाळेचे प्रास्ताविक श्रीमती प्रतिज्ञा दाभाडे, प्रकल्प अधिकारी, समतादुत प्रकल्प, जिल्हा नाशिक आणि संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. चंद्रकांत इंगळे समतादूत यांनी केले तर या कार्यशाळेचे आभार व बार्टी मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण योजना याविषयी अधिक माहिती श्री. नितीन सहारे, प्रकल्प व्यवस्थापक, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समन्वय विभाग आणि प्रशिक्षण विभाग यांनी दिली.या कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता होलार समाजाचे सर्व स्तरावरील राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य केले आणि समतादुत प्रकल्प, नाशिक, समाज कल्याण कार्यालय, नाशिक, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण कार्यालय, नाशिक तसेच बार्टी मुख्यालय प्रशिक्षण विभाग कार्यालय अधिक्षक श्रीमती प्रज्ञा मोहिते यांचे मार्गदर्शन, श्री. महेश गवई, प्रकल्प व्यवस्थापक, कौशल्य विकास विभाग, श्री. सचिन नांदेडकर, प्रकल्प अधिकारी, सचिन गिरमे, लिपिक, श्रीमती सुनिता कदम व श्री. नितेश गायकवाड, संशोधन सहाय्यक श्रीमती उज्वला धेंडे, लिपिक व श्री. गणेश तुपधर, सहाय्यक, श्री. रविराज सुरवाडे वाहन चालक यांचेही सहकार्य लाभले.

## मातोश्री श्रीमती हौसाबाई भिंगारदेवे यांच्या पुण्यतिथीदिनी अण्णा भाऊ साठे पुतळा उभारणीस ५१ हजार रुपयेचा धनादेश सुपूर्द



विटा : येथील विटा नगरपरिषद विटा आणि साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे स्मारक समितीच्या संयुक्त विद्यमाने शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकालगत नेहरूनगर येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारणीचे कार्य सुरू आहे.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे सांगली जिल्ह्याचे सुपुत्र आणि जागतिक कीर्तीचे साहित्यिक असलेने सांगली जिल्ह्याचे स्वाभिमानाचे प्रतिक आहेत. सदरचे स्मारक जिल्ह्यातील सर्वच जाती धर्मातील लोकांच्या सहभागाने होणे हे त्यांच्या विचाराचा सन्मान आहे.जाती धर्म आणि राजकारणाच्या पलीकडे व्यापक दृष्टीने हे स्मारक उभे केले जावे हा यामागचा हेतू आहेया चांगल्या कामात आपले उचित योगदान देण्याच्या उद्देशाने मातोश्री श्रीमती हौसाबाई रामचंद्र भिंगारदेवे यांच्या २३ व्या पुण्यतिथीदिनी श्रीरामनगर येथील स्वर्गीय रामचंद्र बाबाजी भिंगारदेवे (दादा) यांच्या स्मरणार्थ , भिंगारदेवे परिवार व वसंत रामचंद्र भिंगारदेवे फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने

५१०००/- हजार रुपयेचा धनादेश माजी आमदार सदाशिवराव (भाऊ) पाटील यांच्या उपस्थित पुतळा समितीचे अध्यक्ष विश्वनाथ (दादा) कांबळे, माजी उपनगराध्यक्ष सुभाष (तात्या)भिंगारदेवे , पुतळा समितीचे उपाध्यक्ष रामचंद्र भिंगारदेवे, माजी उपनगराध्यक्ष संजय भिंगारदेवे, प्रशांत (आप्पा) कांबळे,शेखर भिंगारदेवे, कैलास भिंगारदेवे,प्रफुल भिंगारदेवे यांच्याकडे कुंडलिक रामचंद्र भिंगारदेवे , माजी मुख्याध्यापिका आक्काताई विठ्ठल लोखंडे, व संजयकुमार वसंत भिंगारदेवे यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.

याप्रसंगी उपस्थित बाळासाहेब भिंगारदेवे उदय (बापू) भिंगारदेवे , संजय (बुवा) भिंगारदेवे , सुनिल भिसे, गणेश भिंगारदेवे, प्रणय (भैया) भिंगारदेवे, संभाजी भिंगारदेवे,सुरेश भिंगारदेवे सुधाकर भिंगारदेवे, विनोद भिंगारदेवे(सर),अशोक भिंगारदेवे, तुकाराम भिंगारदेवे, अक्षय भिंगारदेवे, विवेक भिंगारदेवे, विशाल भिंगारदेवे, विजय भिंगारदेवे, संतोष लोखंडे, युवा उद्योजक कुलदीप भिंगारदेवे, सागर भिंगारदेवे आदी उपस्थित होते.

## सोलापूर जिल्हा कुरुहिनशेट्टी ( कोष्टी )समाज विकास मंडळ यांची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधी : मंद्रूप संस्कृत पंडित प्रवचनकार रामचंद्र म्हेत्रे सर यांचे हस्ते श्री. शंकर शिवाचार्य महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून ३१ वी वार्षिक सभा दिनांक १८ सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी दहा वाजता गुरुपादप्पा कोकळगी यांच्या अध्यक्षते खाली सुरुवात करण्यात आले.

त्यानंतर अर्धा तास श्रावण महिना निमित्त प्रवचनकार म्हेत्रे सर यांचे प्रवचन झाले. त्यानंतर गेल्या वर्षभरात समाजातील दिवंगत समाज बांधवांना दोन मिनिटे सर्वजण उभे राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. व सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आले . चिदानंद परतबादी उपाध्यक्ष कोष्टी समाज यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचून दाखवले तसेच मागील वर्षभरातील जमा व खर्च वाचून दाखवले व त्यास मंजुरी घेतली. तदनंतर देणगीदारांचा , प्रमुख पाहुण्यांचा, सेवानिवृत्त समाज बांधवांचा, तालुका कार्यकारिणीचे अध्यक्ष, तसेच राज्य कार्यकारणी संचालक बंडू गणगले



, विकास पाटील तसेच विविध स्पर्धेमध्ये व शैक्षणिक विद्यार्थ्यांचा सत्कार अध्यक्ष गुरुपादप्पा कोकळगी, प्रमुख पाहुणे म्हेत्रे सर , उपाध्यक्ष,तसेच संचालक यांचे हस्ते करण्यात आला. यानंतर प्रमुख पाहुण्यांचे मनोगत व मार्गदर्शन झाले.

नंतर पुढील सन २०२३ ते २०२८ करिता नवीन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आले त्यात नूतन अध्यक्ष म्हणून गुरुपादप्पा कोकळगी , उपाध्यक्ष म्हणून चिदानंद परतबादी , अनिल कोणशिरसगी खजिनदार, संतोष म्हेत्रे .सचिव, तसेच संचालक संदीप कोकळगी, राजकुमार काळे, विकास पाटील, अनिमेश चिखले, मनोज गुरव, मनोज चनाप्पा गुरव, मल्लिनाथ जीपटे,मधुकर देवरगुडी ,सौ सुजाता पडनुरे, सौ संगीता कोरे ,सौ मोनिका कोष्टी यांची बिनविरोध निवड करण्यात आले व उपस्थित समाज बांधवांनी अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

अध्यक्ष गुरुपाद(आण्णा)कोकळगी यांनी समारोप प्रसंगी समाज बांधवांना मार्गदर्शन करून उपस्थित समाज बांधवांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले .सभेचे सूत्रसंचालन संतोष म्हेत्रे यांनी केले.

## शिक्षिका सीमाराणी दादाजी बागुल यांना शाब्बास गुरूजी पुरस्कार

नाशिक/प्रतिनिधीः आदर्श शिक्षिका व उत्तम कवयित्री सीमाराणी दादाजी बागुल यांना २०२३ मधील शाब्बास गुरूजी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. शिक्षिका सीमाराणी दादाजी बागुल म्हसरूळ पंचवटी , नाशिक येथे राहत असून त्या विविध विषयावर उत्तम कविता लिहतात व प्रबोधन करीत असतात. त्यांचा




सामाजिक तसेच विविध क्षेत्रांमध्ये नेहमीच सहभाग असतो.

विविध कवी, साहित्य संमेलनात त्याचा सहभाग असून विविध विषयांवर प्रबोधनात्मक कविता सादर करीत असतात. एवढंच नव्हे तर, अष्टपैलू व्यक्तित्वामुळे एक उत्तम कवयित्री म्हणून त्यांची ओळख आज इतरांच्या नजरेतून पाहायला मिळते. अनेक कार्यक्रमात ते सूत्रसंचालनाची धुरा सुध्दा सांभाळत असतात. म्हणून त्यांच्या कर्यांची दखल घेऊन आर, बी, एच प्राथमिक विद्यालय गंगापूर रोड नाशिक येथील शिक्षिका सीमाराणी दादाजी बागुल यांना शाब्बास गुरुजी फाऊंडेशन, मालेगांव मालेगांव जि. नाशिक यांच्या वतीने कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक डॉ विनोद गोरवाडकर, सरकारी वकील ड. शिशिर हिरे , अप्पर पोलिस अधिक्षक अनिकेत भारती , मर्चंट बँक मालेगावचे चेअरमन राजेंद्र भैय्या भोसले, उद्योजक संजय(भाऊ) फतनानी, उद्योजक गुरूदासजी गावडे यांच्या उपस्थितीत आदर्श शिक्षिका व उत्तम कवयित्री सीमाराणी दादाजी बागुल यांना २०२३ मधील शाब्बास गुरूजी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पुरस्काराची बातमी कळताच मिळताच शिक्षक साहित्यिक तर विविध क्षेत्रातील नागरिकांकडून शिक्षिका सीमाराणी दादाजी बागुल यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांचे कौतुक केले जात आहे.

## चेअरमन अभिजीत पाटील यांच्या मागणीची उपमुख्यमंत्र्यांकडून दखल

### जिल्हाधिकारी कार्यालयास तात्काळ अहवाल पाठविण्याची सूचना पंढरपूर उपनगरातील महत्वाचा प्रश्नांची लवकरच होणार सोडवणूक

पंढरपूर/प्रतिनीधी : पंढरपूर शहरातील उपनगरामध्ये राहणाऱ्या नागरिकाच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागील काही दिवसांपुर्वी पत्र दिले होते. त्या पत्राची तात्काळ दखल घेतली आहे. त्याबाबत सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयास याबाबतचा अहवाल तातडीने पाठविण्यास सूचना केल्यामुळे उपनगरातील लोकांचे आर्थिक नुकसान टळनार आहे.

या उपनगरातील लोकांना अनेक वर्ष शेतसारा कर आणि नगरपालकेतील कर असे दोन्ही कर भरावे लागत होते. त्यामुळे विनाकारण आर्थिक भुर्दंड बसत होता. याबाबत चेअरमन अभिजीत पाटील यांच्याकडे उपनगरातील लोकांनी आपले



गाऱ्हाणे मांडले होते. त्यानुसार पाटील यांनी १७जुलै रोजी उपमुख्यमंत्री यांना याबत एक निवेदन देण्यात आले होते. या निवेदनात वरील करापैकी फक्त नगरपालिका कर घेण्यात यावा. या भागातील लोकांना नगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे मध्ये समावेश करण्यात यावा. एक घर एक कर घेऊन नागरिकांचा आर्थिक बोजा कमी करावा अशी मागणी केली होती.

वरील देण्यात आलेल्या निवेदनाची दखल घेण्यासाठी उपमुख्यमंत्री कार्यालयाकडून जिल्हाधिकारी कार्यालयास पत्र प्राप्त होताच हालचाली सुरू झाल्या आहेत.

याचाच एक भाग म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाने पंढरपूर नगरपालिकेसाठी २१सप्टेंबर रोजी पत्र पाठविले असून याबाबतची प्रत चेअरमन अभिजीत पाटील यांना देण्यात आली आहे. पंढरपूर व उपनगरातील लोकांच्या समस्या असल्याने तत्काळ पावत्या घेऊन संपर्क करावा असे आवाहन अभिजीत पाटील यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वरील पत्रांमधून तात्काळ याबाबतची दखल घेऊन पंढरपूर नगरपालिकेला अहवाल पाठविण्याची सूचना करण्यात आली आहे. यामुळे मोठ्या संख्येने वास्तव्यास असलेल्या नागरिकांकडून चेअरमन अभिजीत पाटील यांचे विशेष आभार मानले जात आहे.

### मतदार संघातील महत्वाचे प्रश्नासाठीच घ्यावी लागते मंत्र्यांची भेट

विठ्ठलचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी केवळ साखर कारखानदारी हेच काम पाहत बसले नाहीत. त्यांनी आगामी विधानसभा डोळ्यासमोर ठेऊन पंढरपूर आणि मंगळवेढा भागातील अनेक महत्वाचे प्रश्न मांडले आहेत. यासाठीच त्यांची नेहमी मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्याकडे भेट असते. त्यामुळे पंढरपूर भागातील महत्वाचे प्रश्न आमदार कडून मांडले जात नसले तरी अभिजीत पाटील यांच्या विकासाची दूरदृष्टी असलेल्या अभिजीत पाटील यांच्याकडून अनेक महत्वाचे प्रश्न मार्गी लागणार असल्याचा पक्का विश्वास पंढरपूर मंगळवेढा मतदार संघातील जनतेला वाटू लागला आहे.

## कैद्यांसाठी कायदेविषयक जनजागृती शिबीर संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांचे निर्देशानुसार तालुका विधी सेवा समितीतर्फे वेळोवेळी जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगाने विधी सेवा समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश एम. बी. लंबे यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर कारागृह येथे कैद्यांसाठी कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.सदर आयोजीत शिबीरात कैद्यांना त्यांच्या असणाऱ्या हक्क व कर्तव्याची जाणीव करण्यासाठी तसेच विधी सेवा समिती मार्फत कैद्यांच्या लाभाविषयीची माहिती देण्यासाठी न्यायाधीश पी.पी. बागुल यांच्या अध्यक्षतेखाली शिबीराचे आयोजन



करण्यात आले होते. सदर शिबीरास पंढरपूर बार असोसिएशनचे अध्यक्ष अर्जुन पाटील, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, विधीस्वयंसेवक सुनिल यारगट्टीकर, नंदकुमार देशपांडे, पांडुरंग अल्लापूरकर, अंकुश वाघमोडे तसेच न्यायालयीन कर्मचारी वाय. डी. बोबे, के. के. शेख,विशाल ढोबळे,श्रीकांत भोरे, बागल व सुरवसे उपस्थित होते.

# कोतवाल कर्मचारी सहकारी पतसंस्था ची वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न

## संपुर्ण महाराष्ट्रात सोलापूर जिल्ह्यासाठी एकमेव पतसंस्था




अक्कलकोट/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा कोतवाल कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर ची पतसंस्था वार्षिक सर्वसाधारण सभा सोलापूर येथे जिल्हा अधिकारी बहुउद्देशीय सभागृह येथे वार्षिक सर्वसाधारण सभा विठ्ठल गुरव चेअरमन याचा अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. या सभेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून कुमार आशीर्वाद जिल्हा अधिकारी सोलापूर, राजशेखर लिबारे तहसिलदार मुंद्रुप हे उपस्थित होते.

कुमार आशीर्वाद जिल्हा अधिकारी राजशेखर लिबारे विठ्ठल गुरव चेअरमन चंद्रकांत हेडगिरे शतुन गायकवाड समाधान सुर्यगंध इरणा काबळे मलिनाथ बाळगी सर्व संचालक व संचालिका इतर मान्य वर यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करून, सोलापूर ग्रामदैवत सिध्देश्वर महाराजाच्या फोटोला पुष्पहार घालून पुजा करण्यात आले.

यानंतर विठ्ठल गुरव चेअरमन यांनी संस्था चे प्रस्तावना सादर केले, तसेच संस्था काढायचे हेतु कोतवाल कर्मचारी समस्या जाणून कौटुंबिक, शैक्षणिक, सामजिक, आर्थिक पाल्याचे शैक्षणिक व वैद्यकीय खर्च, लग्न कार्य इतर गोष्टी चा विचार करून संस्था स्थापन करण्यात आले चे महिती विठ्ठल गुरव चेअरमन यांनी दिली.सन २८/१२/२०१८ रोजी संस्था रजिस्ट्रेशन करणात आले असून, संपूर्ण महाराष्ट्रात ही एकमेव संस्था सोलापूर जिल्ह्यात अस्तित्वात असून, संस्था रजिस्ट्रेशन कारणासाठी तात्कालीन जिल्हा अधिकारी डॉ राजेंद्र भोसले, तात्कालीन अपर जिल्हाधिकारी रामचंद्र शिंदे जिल्हा उपनिबंधक अविनाश देशमुख व शतुन गायकवाड यांच्या सहकार्याने ही संस्था रजिस्ट्रेशन करणात आली असून,सोलापूर जिल्हा कोतवाल कर्मचारी सहकारी पतसंस्था सभासद ३४८ सभासद असून संस्थेचे उलाढाल एक कोटी रुपये असलेल्या ची माहिती संस्थेने दिली , सभासद तसेच संस्थाने विविध उपक्रम राबवले असल्याचे सांगितले.कोविड काळात मयत दिवंगत कोतवाल यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये खालील विषय एकमताने मंजूर करण्यात आले आहे.दीर्घ ऐंशी हजार रुपये, तातडीचे कर्ज वीस हजार रुपये मासिक वर्गणी एक हजार रुपये असे निर्णय एक मताने मंजूर केला आहे असे महिती चेअरमन विठ्ठल गुरव यांनी दिले आहे.पतसंस्था वार्षिक सर्वसाधारण सभा कुमार आशीर्वाद जिल्हा अधिकारी सोलापूर, राजशेखर लिबारे तहसिलदार, चंद्रकांत हेडगिरे निवासी नायब तहसिलदार, शतुन गायकवाड, प्रदेश उपाध्यक्ष महसूल कर्मचारी कषणा शिंदे सरचिटणीस कोतवाल संघटना, जंयत जुगदार जिल्हाध्यक्ष, लक्ष्मीकांत ऐगोळे जिल्हा प्रवक्ता, विठ्ठल गुरव जिल्हा उपाध्यक्ष, महसूल कर्मचारी संघटना बंदीश वाघमारे, जिल्हा अध्यक्ष वाहान चालक संघटना, मनोज भाडेकर, जिल्हा अध्यक्ष बाबा कांबळे, अनिल जाधव, प्रसिद्धीप्रमुख प्रविणकुमार बाबर, सचिव भगवान पारशी विठ्ठल गुरव चेअरमन, व्हाईस-चेअरमन समाधान सुर्यगंध, मुख्य प्रवर्तक मा.दिलावर वाघमारे, कृष्णा शिंदे, राहुल तोडकरी,मल्लिनाथ बाळगी,औदुसिध्द पुजारी,प्रल्हाद खरे,संजय वाघमारे, राजेंद्र कुंभार,सुलोचना देशमुख, गुरुदेवी पुजारी, ईराण्णा कांबळे.संचाक मंडळ मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

# स्थानिक गुन्हे शाखेकडून मालाविषयी गुन्हयांची उकल

## सोलापूर जिल्हयातील २४ घरफोडी, ०२ चोरी गुन्हे उघड, १५ लाख ५८ हजार ५९० रूपये किमतीचे सोन्या चांदीचे दागिने हस्तगत



सोलापूर/प्रतिनिधीः पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी जिल्ह्यामध्ये घडणारे मालाविषयी गुन्ह्यांचा आढावा घेवून स्थानिक गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणेकामी मार्गदर्शन व सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे मागील आठवड्यात स्थानिक गुन्हे शाखाच्या तिन्ही तपास पथकानी मालमत्तेचे गुन्हे उघडकीस आणनेकामी भरीव कामगिरी केली आहे. त्यामध्ये २४ घरफोडी व २ चोरी असे एकूण २६ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्यामध्ये १५,५८,५९०/- रूपये किंमतीचे सोने, चांदीचे दागिणे, मोबाईल, कॅमेरा व मोटार सायकल असा मुद्देमाल जप्त केला आहे,

सुरेश निंबाळकर, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. यांच्या नेतृत्वाखाली सपोनि / धनंजय पोरे व त्यांचे पथकाने सोलापूर ग्रामीण जिल्हयात यापूर्वी झालेल्या घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत गोपनिय बातमीदार मार्फत माहिती प्राप्त केली, सदर बातमी प्रमाणे मंगळवेढा पोलीस ठाणे गुरंन ४४८/२०२३ भादंवि क. ४५४, ४५७, ३८० या गुन्हयातील आरोपी गोपाळपुर ता. पंढरपूर येथे येणार असल्याबाबत खात्रीशीर माहिती पथकास मिळाली होती. सदर पथकाने गोपाळपुर येथे सापळा लावून त्यास ताब्यात घेतले असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली. परंतू त्याचेकडे पथकाने कौशल्यपूर्ण तपास करता त्याने मंगळवेढा, सांगोला, पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका, करकंब, टेंभुर्णी व माळशिरस पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडी व चोरीचे एकूण १५ गुन्हे त्याचे साथीदारा समवेत केल्याची कबूली दिली त्याचेकडे कौशल्यपूर्ण तपास करता सदर गुन्ह्यातील पुढीलप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद आरोपी याचेकडुन सोलापूर ग्रामीण जिल्हयातील उघकीस आले.नमुद आरोपी हा रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी टेंभुर्णी, माढा पोलीस ठाणे येथे , घरफोडी सारखे गुन्हे दाखल आहेत. गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, कडील सपोनि / धनंजय हे करीत असुन त्याची मा. न्यायालयाने ५ पोलीस कोठडी सुनावली होती, स्थानिक गुन्हे शाखेच्या नने केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामुळे आरोपीत याचेकडुन वर नमुद गुन्हयातील ८,७४,३००/- रु. चे २३० ग्रॅम सोन्याचे दागिने व ३५० ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे

नमुद आरोपी हा रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्याचेवर यापुर्वी टेंभुर्णी, माढा पोलीस ठाणे येथे दरोडा, घरफोडी सारखे गुन्हे दाखल आहेत. गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा, कडील सपोनि / धनंजय पोरे हे करीत असुन त्याची मा. न्यायालयाने ५ पोलीस कोठडी सुनावली होती. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने केलेल्या कौशल्यपुर्ण तपासामुळे आरोपीत याचेकडुन वर नमुद गुन्हयातील ८,७४,३००/- रु. किमतीचे २३० ग्रॅम सोन्याचे दागिने व ३५० ग्रॅम चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे पोनि सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सपोनि शशिकांत शेळके यांच्या पथकाने वेळापूर पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुरनं २५६/२०२३, भा.द.वि.क. ४५७,३८० या गुन्हयाच्या तपासकामी बारकाईने व फिर्यादीशी सविस्तर विचारपूस करता फिर्यादीचे घराचे बांधकाम करण्यासाठी पूर्वी आलेला बोरगाव, ता. माळशिरस येथील इसमावर संशय बळावला होता. त्या इसमास ताब्यात घेवून कौशल्यपूर्ण तपास करता त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले त्याचेकडे तपास करता गुन्ह्यात चोरी गेलेला १० तोळे २ ग्रॅम वजानाचे दागिणे व १० चांदीचे बार व मोटार सायकल असा ५,३३,१००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदरचा गुन्हा हा गुन्हा घडल्यापासून १० दिवसाच्या आत सपोनि शेळके व पथकाने कौशल्यपूर्ण तपास करून उघडकीस आणला असून त्यामध्ये गुन्हयातील गेला मालापैकी १०० टक्के मुद्देमाल जप्त केला आहे.

सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई सुबोध जमदाडे यांच्या पथकाने पंढरपूर उपविभागामध्ये यापूर्वी झालेल्या मालाविषयी गुन्हयांचा विस्तृत व बारकाईने विश्लेषण केले असता उपविभागातील बऱ्याचा गुन्ह्यामध्ये एकच गुन्हयांची कार्यपध्दती वापरून गुन्हे झाले असल्याचे दिसून आले.

त्याबाबत गोपनिय माहिती काढला असता पंढरपूर येथील एक इसमाने चोरीचे गुन्हे केले असल्याची खात्रीशीर माहिती पथकास मिळाली होती. सदर आरोपीस ताब्यात घेण्यासाठी पथकाने पंढरपूरमध्ये सापळा लावून त्यास ताब्यात घेतले असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे दिली, परंतू त्याचेकडे पथकाने कौशल्यपूर्ण तपास करता त्याने पंढरपूर शहर, पंढरपूर तालुका व पंढरपूर ग्रामीण मधील एकूण ९ गुन्हे केल्याची कबूली दिली आहे. तसेच त्यांचेकडून सदर गुन्हयातील १,९१,२९०/- किमतीचे सोन्याचे चांदीचे दागिणे, मोबाईल व रोख रक्कम हा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

अशा प्रकारे पोसई सुबोध जमदाडे यांच्या पथकाने ९ गुन्ह्यातील एकूण १,९१,२०९/- रूपये

किंमतीचा मुद्देमाल जप्त करून गुन्हे उघडकीस आणले आहेत. सन २०२३ मध्ये आज अखेर स्थानिक गुन्हे शाखेने मालाविषयीचे दरोडा १, जबरी चोरी ५, घरफोडी ७३ व चोरीचे ४४ असे एकूण ११७ गुन्हे उघडकीस आणून त्यामध्ये १,०५,६८,७६९/- चा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कामगिरी ही शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, हिंमत जाधव, अपर पोलीस अधिक्षक, सोलापूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली सुरेश निंबाळकर, पोलीस निरीक्षक, स्था.गु.शा. सोलापूर ग्रामीण यांच्या नेतृत्वाखाली सपोनि धनंजय पोरे यांच्या पथकातील सपोफी/ख्वाजा मुजावर, श्रीकांत गायकवाड, निलकंठ जाधवर पोहेकों/परशुराम शिंदे, सलीम बागवान, विजयकुमार भरले, हरिदास पांढरे, पोकों/विनायक घोरपडे, समर्थ गाजरे, दिलीप थोरात यांनी पार पाडली आहे. तर सपोनि शशिकांत शेळके यांच्या पथकातील पोसई राजेश गायकवाड, सहाफी नारायण गोलेकर, मोहन मनसावाले, धनाजी गाडे, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, अक्षय डोंगरे, यश देवकते समीर शेख यांनी पार पाडली आहे. तसेच पोसई सुबोध जमदाडे, यांचे पथकातील श्रेणी पोसई बिराजी पारेकर, सहा. फो. शिवाजी घोळवे, पोह प्रकाश कारटकर, पोना रवि माने, पोकों अजय वाघमारे, सुरज रामगुडे यांनी पार पाडली आहे.

# सीमेवर रक्षण करणाऱ्या (फौजी) जवानांच्या कुटुंबियांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिव आरोग्य सेना सज्ज : डॉ.किशोर ठाणेकर




वागदरी/एस.के.गायकवाड :शिव आरोग्य सेना कार्याध्यक्ष डॉ.किशोर ठाणेकर,राज्य उपाध्यक्ष डॉ.जयवंत गाडे तसेच राज्य मुख्य समन्वयक श्री.जितेंद्र दगडू सकपाळ यांच्या संकल्पनेतून देशाच्या सैनिकांची आरोग्य सेवा करण्याबाबत अभियान ची माहिती देण्यात आली.

देशाच्या सीमेवर तैनात जवान (फौजी) हे देशाचे रक्षण करीत असतात. आणि त्या जवानांच्या कुटुंबियांच्या मेडिकल इमर्जन्सी, दवाखान्याच्या सुविधा किंवा आरोग्याची काळजी घेण्यासाठी शिव आरोग्य सेना सज्ज आहे असे प्रतिपादन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाशी सलंग्न असलेल्या शिव आरोग्य सेनेचे कार्याध्यक्ष डॉ.किशोर ठाणेकर यांनी केले. तालुकानिहाय जवानांच्या कुटुंबीयांचे सर्वेक्षण केले जाणार असून त्यांना मेडिकल सुविधा साठी मदत करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शिव आरोग्य सेनेचे पुणे जिल्हा समन्वयक दिपक खरात गुरुजी यांनी बारामती येथे पदाधिकारी मीटिंग चे आयोजन केलेले होते त्यावेळी डॉ.ठाणेकर यांनी गुगल मिट द्वारे ऑनलाईन मार्गदर्शन केले.

यावेळी शिव आरोग्य सेनेचे पुणे जिल्हा समन्वयक दिपक खरात गुरूजी, जिल्हा सहसमनव्यक हनुमंत खामगळ, जिल्हा सचिव दिलीप नाळे, इंदापूर तालुका समन्वयक सचिव सचिन नरुटे,

बारामती शहर समन्वयक मोतजमिन झैदी, सुनील पवार, मयूर थोरात इत्यादी उपस्थित होते. तर ऑनलाईन पद्धतीने पुणे (शहर) जिल्हा समन्वयक रमेश क्षीरसागर, इंदापूर तालुका समन्वयक अनिल पाटील व तालुका संघटक राजेंद्र दिवार उपस्थित होते.

## भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग यांच्या वतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त

# करकंब येथे शासन आपल्या दारी उपक्रमाचे आयोजन



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील करकंब येथे आपल्या देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त शासन आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन शुक्रवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता वडार भवन करकंब येथे केलेले आहे .तरी तालुक्यातील जास्तीत जास्त गरजू लोकांनी खालील दाखल्यांच्या लाभ घ्यावा. असे आवाहन भाजपा पंचायत राज व ग्रामविकास विभाग पंढरपूर तालुका संयोजक मनोज पवार यांनी केलेले आहे.

यामध्ये जातीचे दाखले ,उत्पन्नाचे दाखले, ज्या रेशनिंग धारकांना धान्य भेटत नाही अशा लोकांना धान्य भेटण्यासाठी ऑनलाईन प्रक्रिया करणे, संजय गांधी निराधार योजना ,श्रावण बाळ योजना, व अन्य काही दाखले मिळणार असून रेशनिंग धारकांनी रेशनिंग कार्डची झेरॉक्स, तलाठ्याचा उत्पन्नाचा दाखला, व रेशनिंग कार्ड वरील सर्व व्यक्तींची आधार कार्डचे झेरॉक्स इ.कागदपत्रे जातीचा दाखला मिळण्यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, पुराव्यासाठी OBC - 1967, VJNT -1961 SC - 1950 SBC - 1967 अगोदरचा जन्म दाखला, पॅन कार्ड , उत्पन्नाच्या दाखल्यासाठी – तलाठ्याचा उत्पन्नाचा दाखला ,आधार कार्ड, पॅन कार्ड ,रेशन कार्ड झेरॉक्स फोटो इ.तरी वरील प्रमाणे कागदपत्रांची पूर्तता करून वरील दाखल्यांचा लाभ घेण्यासाठी जास्तीत जास्त गरजु लोकांनी करकंब येथील वडार भवन येथे शुक्रवार दिनांक २९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता उपस्थित राहावे.

# आमदार सत्यजित तांबे यांचा विविध सामाजिक उपक्रमांने वाढदिवस साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः अक्कलकोट येथे सरफराज शेख मित्र मंडळाच्या वतीने ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांना फळे खाऊ पाण्याची बॉटल अशा उपयोगी वस्तू वाटप करून सत्यजित दादा तांबे यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला या छोटे खानी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आपुलकी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सन्माननीय विशाल राठौर ,तर प्रमुख अतिथी म्हणून चंद्रशेखर उर्फ आप्पी कलशेट्टी मालक, सर्फराज शेख मित्र मंडळाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित होते तसेच कार्यक्रमाच्या प्रसंगी डॉक्टर निखिल क्षीरसागर डॉक्टर सतीश बिराजदार, रमेश वाले काका शिऊ अण्णा स्वामी, मा. नगरसेवक सद्दाम शेरीकर, शबाब शेख श्री समीर शेख सोएब एळसंगी ,अखिल फुलारे ,अजहर जंगी सैपन तांबोळी एजाज शेख, रियाज आदोने, सोहेल मटकी, सोहेल शेख ,तोफिक नदाफ, फारुक बबरची आदि मान्यवर उपस्थित होते,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भी लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी केले

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कळंब तालुकाध्यक्षपदी अमर मडके यांची निवड



कळंब/प्रतिनिधी : तालुक्यातील मोहा येथील अमर मडके यांची राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या कळंब तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार,प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे,व युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, यांच्या मान्यतेने सुरेश बिराजदार, व सुरेश पाटील, यांच्या सूचनेनुसार सामाजिक व राजकीय चळवळीत सक्रिय असणारे तसेच तालुक्यात दांडगा संपर्क असणारे युवकांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवणारे मोहा येथील अमर मडके यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, युवक जिल्हाध्यक्ष दिग्विजय शिंदे, युवक प्रदेश सरचिटणीस शंतनू खंदारे, जिल्हा कार्याध्यक्ष मनोज जगताप, शमशोद्दीन जमादार, व इतर कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.




# भिवंडीत धम्मपद महोत्सव मोठया उत्साहात

भिवंडी/मिलिंद जाधव : नागसेन बुक डेपो, कल्याण आयोजित धम्मपद गाथा आणि कथा घराघरात या अभियान अंतर्गत भिवंडी शहरात धम्मपद महोत्सव मोठया उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष सदानंद गायकवाड होते. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन भंते राहुल बोधी,ज्येष्ठ साहित्यिक डी.एल. कांबळे स्वागताध्यक्ष सदानंद गायकवाड, सोमनाथ भोसले यांनी केले. धम्म देसना व प्रमुख मार्गदर्शन भंते राहुल बोधी यांनी केले. तर धम्मपद गाथा आणि कथा पुस्तकाचे भावानुवादक ज्येष्ठ साहित्यिक डी.एल. कांबळे यांनी त्यांच्या मनोगतातून केले.

महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका सुषमादेवी शिंदे यांनी बुद्ध ,भीम गीतांचा कार्यक्रम सादर करत नागरिकांचे प्रबोधन केले. यावेळी भिवंडी मनपा माजी शहर अभियंता एल. पी गायकवाड , बसपा महा.प्रदेश महासचिव अशोक गायकवाड, पत्रकार संतोष चव्हाण,महाराष्ट्र राज्य मजूर जनरल कामगार युनियन भिवंडी युनिटचे अध्यक्ष भारत जी. तांबे, मनोज भोईर, अँड. शशिकांत जाधव, प्रल्हाद गायकवाड, भाऊसाहेब साबळे, शांताबाई साळवे, गणेश सोष्टे, अँड .श्रीकांत कांबळे , रवींद्र गायकवाड ,कृष्णा गायकवाड अँड.संदीप जाधव , अँड.सचिन भोईर , अँड. आनंद दोंदे,विनोद जाधव, विश्वनाथ गायकवाड , विजय जाधव, विनायक जाधव तर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शशिकांत चव्हाण यांनी केले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नागसेन बुकडेपोचे संचालक सोमनाथ भोसले, स्वागताध्यक्ष सदानंद गायकवाड ,भारत तांबे, बापू माने यांनी मेहनत घेतली.